महाराष्ट्र टाइम्स संवाद

23.11.2025


# शहराची देखणी रेषा


**तस्नीम झकारिया मेहता**

mtedit@timesofindia.com





**मुंबईत सन १९३० आणि १९४० च्या दशकात एका आगळ्यावेगळ्या आंतरराष्ट्रीय वास्तुशैलीने मुंबईशी नाते जोडले. सिनेमागृहे, हॉटेले आणि निवासी इमारती येथे ही रचना दिसू लागली. व्हिक्टोरियन शैलीपेक्षा ही रचना वेगळी होती. या 'आर्ट डेको' शैलीसंबंधीचे प्रदर्शन डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालयात सुरू आहे. २५ नोव्हेंबरपर्यंत ते खुले असेल. 'आर्ट डेको' शैलीची ही ओळख...**


प्रशस्त व्हांडे, त्या व्हाड्यांमध्ये टांगलेले कंदील, एखाद्या मोठ्या पायऱ्या पायऱ्यांच्या पिरॅमिडसारखी रचना यामुळे मुंबई शहराच्या पारंपरिक चौकटीतील इमारतींपासून काही इमारती वेगळ्या ठरतात. ही रचना शहराचे हवामान आणि रहिवाशांच्या गरजा लक्षात ठेवून केलेली होती. पूर्वी अस्तित्वात असलेल्या व्हिक्टोरियन शैलीपेक्षा ही रचना वेगळी होति. या शैलीचे नाव 'आर्ट डेको'. मुंबईत सन १९३० आणि १९४० च्या दशकात या आंतरराष्ट्रीय शैलीने मुंबईशी नाते जोडले. सिनेमागृहे, हॉटेले आणि निवासी इमारती येथे ही रचना दिसू लागली. मुंबईच्या नरिमन पॉइंट येथील समुद्रकिनाऱ्यावर किनारपट्टीच्या सौंदर्यामध्ये भर घालत या इमारती उभ्या राहिल्या. माटुंग्यापासून कुलाब्यापर्यंत आणि अगदी उपनगरांत मालाडसारख्या गावठाणांपर्यंत या इमारतींचे सौंदर्य आकर्षित करून घ्यायला लागले. आजही या इमारती मुंबईमध्ये स्वतःचे वैशिष्ट्य जपत दिमाखात उभ्या आहेत. मुंबईच्या दमट हवेमध्ये या विशेष रचनेतील इमारतींमध्ये मोकळा श्वास घेता येतो..

मुंबईमध्ये भायखळ्याच्या डॉ. भाऊ दाजी लाड वस्तूसंग्रहालयामध्ये 'आर्ट डेको'शी निगडीत एक प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या निमित्ताने लोकांसमोर 'आर्ट डेको'चा हा इतिहास उलगडतो आहे.

सन १९२५ ते २०२५ ओशन ड्राइव्ह टू मरिन ड्राइव्ह- मुंबईच्या आर्ट डेकोच्या शताब्दीचा आराखडा, मियामी - मुंबई अशी या प्रदर्शनाची संकल्पना आहे. आर्ट डेकोने आधुनिक अभिजातता आणि देशाच्या बदलत्या आकांक्षांचेही प्रतिनिधित्व केले. ही शैली मला स्वतःलाही फार आवडते. व्हिक्टोरियन शैलीकडून या शैलीकडे वळण्याचा हा कालावधी अधिक अधोरेखित करावासा वाटतो. जे. जे. महाविद्यालयातून बाहेर पडलेल्या तेव्हाच्या युवा वास्तुविशारदांनी मुंबईच्या वास्तुकलेचा परिघ बदलला. यामध्ये पेरीन मिस्त्री, लक्ष्मण साठे, गोपालजी भुता आदींचा समावेश होता. या इमारतींच्या शैलींमधून एका युवा ताकदीचे दर्शन घडवले. हे प्रदर्शन त्याचे प्रतिबिंब आहे.

मुंबईमध्ये २० व्या शतकाच्या सुरुवातील उदयोन्मुख मध्यमवर्गातील नागरिकांची संख्या वाढती होती. वकील, डॉक्टर, इंजिनीअर नव्या संधीच्या शोधात मुंबईत आले. त्यांना स्वतःच्या राहण्यासाठी, मनोरंजनासाठी, विश्रांतीसाठी, कुटुंबासोबत निवांत वेळ घालवू शकतील, अशा जागा हव्या होत्या. आर्ट डेको शैलीने त्यांच्या या मागण्या पूर्ण केल्या. मुंबईच्या 'कॉस्मोपॉलिटन स्पिरिट'चे प्रतिबिंबही यामध्ये दिसते.

१९३२मध्ये सिंडिकेट बँकेच्या इमारतीच्या निर्मितीने आर्ट डेकोची मुंबईत सुरुवात झाली आणि ही शैली हळूहळू सगळ्या भारतात पसरली. स्वतःच्या अवकाशासोबतच समाजाशी जोडले जाणे हेही यातून साध्य झाले. १९३० च्या दशकात, प्लेग, दुष्काळ आणि पहिल्या महायुद्धानंतरच्या आर्थिक मंदीच्या तडाख्यातून हे शहर नव्या जोमाने आणि नव्या उद्देशाने बाहेर पडत होते. शहर स्वतःला पुन्हा नव्याने सावरण्याचा, उभे करण्याचा आणि विकसित करण्याचा प्रयत्न करत होते. सार्वजनिक आरोग्य ही शहराच्या वाढत्या लोकसंख्येसाठी एक प्रमुख चिंता होती. प्रसिद्ध बॅकबे रिक्लेमेशन (१९२८-४२) यासह महत्त्वाकांक्षी शहरी विकास प्रकल्पांमुळे आधुनिक बांधकामासाठी नवीन जमीन आणि संधी उपलब्ध झाल्या आणि मुंबई आर्ट डेको इमारतींची मोठ्या संख्येने उभारणी सुरू झाली. दादरला शिवाजी पार्कजवळही आपल्याला ही रचना दिसते. इरॉस सिनेमागृह हे याचे महत्त्वाचे उदाहरण आहे. शाळा, रुग्णालये, जुने बंगले यांमध्ये याचे प्रतिबिंब दिसते.




डॉ. भाऊ दाजी लाड वस्तुसंग्रहालयात सुरू असलेले हे प्रदर्शन मुंबईचा खास वारसा लोकांना सांगत आहे. २५ नोव्हेंबरपर्यंत ते सर्वांना पाहण्यासाठी खुले आहे. 'आर्ट डेको मुंबई ट्रस्ट'चे अतुल कुमार यांनी क्युरेट केलेले, हे प्रदर्शन मुंबई आणि मियामी या दोन शहरांमध्यील महोत्सवाचा एक भाग आहे. आर्ट डेको ही वास्तुकला आणि डिझाइनची एक शैली होती, जी १९२० आणि १९३० च्या दशकातील आशावादी, युद्धोत्तर काळात जगभरातील शहरांनी स्वीकारली होती, हे यातून दिसते. यामुळे बंदरालगतच्या शहरांमध्ये येणाऱ्या वाढत्या लोकसंख्येचे जीवन समृद्ध झाले आणि भविष्याच्या नवीन दृष्टिकोनातून त्यांनी नवे जीवन सुरू केले. जागतिक चळवळीचा स्थानिक पातळीवर, विशेषतः मुंबई आणि मियामीमध्ये कसा पुनर्विचार केला गेला, हेही या प्रदर्शनातून दाखवायचे आहे. येथील रहिवाशांच्या आंतरराष्ट्रीय जीवनशैलीच्या स्वप्नांसाठी स्थानिक घटकांचा कसा वापर करण्यात आला. मुंबई आणि मियामी या दोन वैश्विक शहरांची विकसित होत असलेली ओळख यात कशी प्रतिबिंबित झाली, हेही इथे समजते. या प्रदर्शनाच्या निमित्ताने शहराच्या संस्कृतीचा पैलू व्यापक आणि आकर्षक पद्धतीने सादर होत आहे. मुंबईच्या या वारशाचे जतन करायचे असेल तर त्याची ओळख होणे आवश्यक आहे. त्यातूनच जतन आणि संवर्धनाची बीजे रोवली जातील.


**(लेखिका डॉ. भाऊ दाजी लाड वस्तुसंग्रहालयाच्या व्यवस्थापकीय विश्वस्त आणि संचालक आहेत.)**


सं वा द


https://epaper.indiatimes.com/timesepaper/publication-maharashtra-times,city-mumbai.cms